अधिसूचना

क्रमांक : १७३/ २०२३ दिनांक : १९/१०/२०२३

विषय : Theory (External) + Theory (Internal) परीक्षेबाबतचा सुधारित अनुपात.

सर्व सामान्यांच्या माहितीकरिता अधिसूचित करण्यात येते की, शैक्षणिक सत्र २०२३-२०२४ पासून विद्यापीठ तसेच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील यु.जी.सी. मान्यताप्राप्त पदव्युत्तर अभ्यासक्रमांना NEP-2020 च्या शिफारशी लागू करण्यात आल्या आहेत. यानुषंगाने सुधारित अभ्यासक्रम व अध्यापन, अध्ययन, परीक्षा व मूल्यमापन योजना तयार करुन त्या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसृत करण्यात आल्या आहेत.

सदर योजनेत Theory (External) + Theory (Internal) यांची विभागणी 70:30 या अनुपातात दर्शविली आहे.

परंतु, वरीलप्रमाणे दर्शविलेल्या अनुपातात सुधारणा करण्यात आली असून सुधारित अनुपात 60:40 म्हणजेच अनुक्रमे Theory (External) + Theory (Internal) असा बदल करण्यात आला आहे. या सुधारित अनुपातानुषंगाने पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठीच्या निर्गमित करावयाच्या निदेशांमध्ये या सुधारणेचा समावेश करण्यात आला आहे.

सर्व संबंधितांनी याची कृपया नोंद घ्यावी.

स्वा/-
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****